# घरगुती गॅससिलेन्डर मधून विशिष्ठ पाईपने गॅस चोरी करून काळाबाजाराने विक्री करणारे गॅंगचा युनिट ३ गुन्हे शाखेकडुन पर्दाफास

दिनांक १९/०१/२०१८ रोजी १४/३० वाजताचे सुमारास भैय्यावाडी, मुळारोड, खडकी पुणे येथे दालचा खाना या हातगाडीजवळ कॅन्टोमेन्ट टोल नाकयाचे शेजारी श्रीराम गॅस एजन्सी, बोपोडी पुणे चे कामगार लाल रंगाचा टेम्पो क्रमांक एम एच १२ ई एफ १३६१ हा बाजूला पार्क करून टेम्पो शेजारी दोन कामगार हे ग्राहकांचे वितरीत करणारे टेम्पोमधील सिलेंडरमधुन, काही सिलेन्डर खाली काढुण त्यांना आडवे पाडून एका सिलेन्डर मधून दुस-या सिलेन्डर मध्ये एका विशिष्ठ पाईपाने बेकायदेशीर गॅस काढून घेवुन तो काळाबाजाराने विकत असल्याची बातमी मिळाल्याने युनिट क्र. ३ कडील अधिकारी व कर्मचारी यांनी बातमीचे ठिकाणी जावूण छापा घालुण आरोपीत नामे १.सुनिल भवरलाल नैन वय २३ वर्ष रा. पुजा हॉस्पीटल, गुरवपिंपळे, सांगवी, पुणे. मुळ रा. मु.केलंसर पो.भोजस्सर, ता.बोप, जि जोधपूर राजस्थान राज्य, २. दिनेश चेन्नाराम जानी वय १९ वर्ष रा. पुजा हॉस्पीटल, गुरवपिंपळे, सांगवी, पुणे. मुळ रा. मु लोडता पो.डेच्चू ता.बालेसर जि. जोधपूर राजस्थान राज्य, यांना गॅस काढुण घेत असताना पकडून त्यांचेकडुन एकुण रूपये ३,२९,३०० रूपयेची मालमत्ता एक पॅगो कंपनीचा टेम्पो, एकुण ३३ गॅस सिलेंडर्स, एक स्टेनलेसस्टीलचा लंबाकृती पाईप, इलेक्ट्रानिक वजनकाटा, गॅस डिलेव्हरी पावत्या, रोख रूपये असे जप्त करून खडकी पोलीस ठाणे येथे भादविक ४२०, ३७९, ३४ व जिवनावश्यक वस्तु कायदा कलम ३ ,७ व लिक्वीफाईड पेट्रोलियम गॅस कायदा सन २००० चे कलम ४ व ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरील कामगिरी गुन्हे शाखेचे श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप-आयुक्त, श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा, युनिट ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सिताराम मोरे, शिवानंदन स्वामी पो हवा, रोहीदास लवांडे, गुणशिलंम रंगम, पो हवा, महेंद्र पवार पो हवा, गजानन गाणबोटे पो हवा, आदिनाथ काळे पो.हवा, संदिप तळेकर पो. ना, संदीप राठोड पो. ना, कल्पेश बनसोडे पो शि., यांनी केली आहे.